बुधवार दि.३ जानेवारी २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : १३३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

दैनिक लोकनेता बीड
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com


# दूध अनुदानाची फक्त घोषणा : शासन आदेश काढलाच नाही : आप्पासाहेब पवार

## दुध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये सरकार विषयी प्रचंड नाराजी

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**दौंड:( बबनराव धायतोंडे)**



राज्याचे पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लिटर ५ रुपये अनुदान देण्याची विधानसभेत घोषणा केली होती. त्यानुसार १ जानेवारी पासून सहकारी दूध संघांना दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना ५ रुपये अनुदान देण्यात येणार होते. परंतु १ जानेवारी ही तारीख उलटून गेली तरीही या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी मात्र सहकारी दूध संघांनी हालचाली केलेल्या नाहीत. त्याचे कारण म्हणजे या अनुदानाची ना मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा झाली ना अर्थ विभागाने या अनुदानाला मंजूरी दिली. म्हणजेच पशुसंवर्धन विभागाने शासन आदेश काढला नाही, फक्त घोषणा केली. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांना सध्या २६ ते २७ रुपये प्रतिलीटरचा दर मिळत असल्याचं शेतकरी सांगत आहेत. मग पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री विखे यांच्या घोषणेचं नेमकं झालं काय? या निर्णयाचा शासन आदेश का काढण्यात आला नाही? असा प्रश्नही शेतकरी उपस्थित करत आहेत.वास्तविक विखे पाटलांनी विधानसभेत केलेल्या घोषणेतच सहकारी दूध संघाला दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान मिळेल अशी मेख मारून ठेवली होती. पण त्यावर विरोध झाल्यानंतर २६ डिसेंबर रोजी अहमदनगरमध्ये बोलताना खाजगी दूध संघाला दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत आठवड्याभरात बैठक लावू, असेही सांगितले होते. परंतु आठवडा उलटून गेला ना बैठक बोलावली ना त्याची चर्चा केली. सहकारी दूध संघावर राज्य सरकारचे नियंत्रण आहे. त्यामुळे सहकारी दूध संघाच्या दुधासाठी अनुदान देण्याची घोषणा केली. कारण सहकारी दूध संघांनी अनुदान देण्याबाबत काही गडबड केली तर त्यांच्यावर कारवाई राज्य सरकार करेल असं विखे एकीकडे सांगतात खरे. पण अनुदानाचा शासन निर्णय काढत नाहीत.याचाच अर्थ सहकारी दूध संघांना दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना ५ रुपये अनुदान देण्याची घोषणा पोकळ ठरली. म्हणजेच काय तर पशुसंवर्धन विभागाला हात वर करण्याची आयती संधी मिळाली आहे. त्यामुळे सहकारी दूध संघांनी दरपत्रक जाहीर केलेले नाहीत. हे म्हणजे आधीच नाही हौस त्यात पडला पाऊस, असा प्रकार आहे. एकतर ५ रुपये अनुदान देण्याची घोषणा करायची आणि ती पण अमलात आणायची नाही. आम्ही शेतकरी हिताची घोषणा कशी चटकन करतो, याची शेखी तेवढी मिरवत राहायचं. अनुदानाची घोषणा करतानाही निकष नियम लावले गेले होतेच. सहकारी दूध संघ २९ रुपये दराने दूध खरेदी करणार नाहीत, तोवर राज्य सरकार ५ रुपये अनुदान देणार नाही, अशी या निर्णयात खुटी मारून ठेवली होतीच. त्यामुळे राज्यातील शेतकरी मात्र तीव्र संताप व्यक्त करू लागले आहेत. शेतकऱ्यांना दूध व्यवसाय परवडला नाही पाहिजे, अशी राज्य सरकारची भूमिका आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे दौंड तालुका अध्यक्ष आप्पासाहेब पवार म्हणाले. मागच्या दोन महिन्यांपासून सरकार दूध उत्पादक शेतकऱ्यांना खेळवत आहे. पशुखाद्याचा खर्च २५ टक्क्यांनी कमी करू, असं विखे पाटील म्हणाले होते. पण त्याबाबतही काही निर्णय घेतला गेला नाही. केवळ सहकारी दूध संघांना अनुदान देण्याची घोषण करून सरकारनं शेतकऱ्यांची चेष्टा केली आहे. ७२ ते ७५ टक्के दूध खाजगी दूध संघाला दिलं जातं. मग हा निर्णय झाला तरीही शेतकऱ्यांना फायदा होणार कसा? असा प्रश्न आप्पासाहेब पवार यांनी उपस्थित केला आहे.

# किरण शिनगीरे यांचा नॅशनल आयकॉन अवार्ड या राष्ट्रीय पुरस्काराने दिल्ली येथे सन्मान

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**आष्टी(अण्णासाहेब साबळे)**



आष्टी तालुक्यातील कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे गांधी महाविद्यालयाचे मा.जनरल सेक्रेटरी (जी.एस.) किरण भगवानराव शिनगीरे यांचा भारतीय युवा वेल्फेअर असोसिएशन कडून नॅशनल आयकॉन अवॉर्ड या पुरस्काराने जगदंबिका पाल माजी मुख्यमंत्री उत्तर प्रदेश तथा लोकसभा सदस्य,जय प्रताप सिंग माजी आरोग्य मंत्री उत्तर प्रदेश,एडी सिंग बॉलीवूड डायरेक्टर, रवी किसन सिनेअभिनेता,मोहित नारायण अध्यक्ष भारतीय युवा वेल्फेअर असोसिएशन यांच्या हस्ते दिल्ली येथे सन्मान करण्यात आला.किरण शिनगीरे यांनी सन २०१९ -२० यावर्षी युवकांचे संघटन करून वटणवाडी तालुका आष्टी येथे गांधी महाविद्यालयाचा गावात ७ दिवस कॅम्प घेऊन वृक्षारोपण केले,स्वच्छता मोहीम राबवली.गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीजवळ श्रमदानातून बंधारा तयार केला. पाण्याचे जल व्यवस्थापन कसे करावे? याबाबत तज्ञांकडून गावात युवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले,तसेच जलसंवर्धनासाठी युवकांचे योगदान,ग्रामसमृद्धी मध्ये महिलांचे योगदान,विज्ञान विकास,अध्यात्म व विकास, कवी संमेलन याबाबत तज्ञांनी मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय एकात्मता,पर्यावरण जागृती,ग्रामस्वच्छता, मतदानाचा हक्काविषयी जनजागृती केली,बेटी बचाओ बेटी पढाओ,जलसाक्षरता, अंधश्रद्धानिर्मूलन इत्यादी. तसेच मंदिर व शाळा परिसरात वृक्षारोपण केले. यापुढील कोरोना च्या काळात कोरोना विषयी जनजागृती केली,त्याचबरोबर मास्क,सॅनिटायझर,मोफत धान्य वाटप,आर्सेनिक गोळ्यांचे वाटप, संतूर व डेटॉल साबणचे वाटप, इत्यादी वस्तूंचे वाटप केले, बचत गटाविषयी जनजागृती, लसीकरण मोहीमेत सक्रिय सहभाग,आभा कार्ड विषयी जनजागृती इत्यादी कार्य केले. त्यापुढील काळात पुन्हा गांधी महाविद्यालयाचा वटनवाडी या गावात सात दिवस कॅम्प घेऊन त्यामध्ये विविध कार्य केले.तसेच पुढील काळात मौजे देवी-निमगाव येथे कॅम्पमध्ये प्लास्टिक मुक्ती मोहीम, ग्राम स्वच्छता,मतदानाविषयी जनजागृती इत्यादी कार्य केले. या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांना दिल्ली येथे बी.वाय.डब्ल्यू.ए.कडून दिले जाणारे विविध क्षेत्रातील पुरस्कार जाहिर करण्यात आले होते. त्यामध्ये वर्ष २०२३ किरण शिनगीरे यांना राष्ट्रीय नॅशनल आयकॉन अवॉर्ड या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.तसेच त्यांना यापूर्वीही राज्यस्तरीय कोरोना योद्धा पुरस्काराने जि.अकोला,राज्यस्तरीय आदर्श युवा महाराष्ट्र युथ आयडॉल समाज रत्न पुरस्कार नाशिक,राज्यस्तरीय यशवंत रत्न पुरस्कार बीड येथे, पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.या मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष योगेश शेठ भंडारी,विश्वस्त अध्यक्ष गोकुळदासजी मेहेर,कार्याध्यक्ष कांतिलालजी चानोदिया,सचिव हेमंत शेठ पोखरना,कोषाध्यक्ष डॉ.उमेशजी गांधी,डॉ.महेंद्र पटवा,माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे,चेअरमन भगवान दादा शिनगीरे,झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे,कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामशेठ मधुरकर,गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नंदकुमार राठी, उपप्राचार्य भंडारी ,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.विष्णू गव्हाणे,प्रा.डॉ.नरेंद्र गवळी, प्रा.सोमनाथ हासे, प्रा.डॉ.शिवाजी जगदाळे,प्रा.कल्याणकर , प्रा.डॉ.तुकारम गोंदकर, प्रा.किशोर कोईनकर,प्रा.कराळे प्रा.तळेकर,प्रा.डॉ.अरुणा कुलकर्णी मॅडम,प्रा.डॉ.धनश्री मुनोत मॅडम,प्रा.डॉ.मीरा नाथ मॅडम,सह आदी प्राध्यापक, सरपंच सतीशशेठ धस,विकास म्हस्के,पत्रकार अविनाश कदम, राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अध्यक्ष अण्णासाहेब साबळे,पत्रकार प्रवीण पोकळे,शरद तळेकर,शरद रेडेकर,यशवंत हंबर्डे,अक्षय विधाते,समीर शेख,अशोक मुटकुळे,विठ्ठल काकडे,राम देशमुख,जी.एस.मित्रपरिवार सह विद्यार्थ्यांनी,ग्रामस्थांनी व आष्टी तालुक्यातील विविध संघटनेने ही त्यांचे अभिनंदन केले.

# उदगीर येथील खुनी प्रकरणात अमित उर्फ सोन्या प्रकाश नाटकरे यास जन्मठेपेची शिक्षा

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**सुनील बस्वराज हावा | उदगीर**



उदगीर शहरातील रेल्वे स्टेशन जवळील बसवेश्वर चौक येथे दिनांक २९ जुलै २०२१ रोजी रात्री ०९:४५ वाजता सुमारास बसवेश्वर चौक वोडाफोन केअर सेंटर च्या समोर रोडवर उदगीर येथे अमित उर्फ सोन्या प्रकाश नाटकरे यांनी जगदीश विजय किवंडे यास माझ्याकडे डोळे वटारून का पाहतोस असे म्हणून जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याच्या कमरेला असलेल्या चाकूने जगदीश कीवंडे याचे पोटात मारून गंभीर जखमी केले होते.त्यात जगदीश कवंडे याचा उपचारादरम्यान सरकारी दवाखाना लातूर येथे उपचारासाठी घेऊन जात असताना वाटेतच जगदीश किवंडे हा मयत झाल्याची फिर्याद मयताची आई सुनीता विजय किवंडे यांनी दिनांक ३० जुलै २०२१ रोजी शहर पोलीस स्टेशन उदगीर येथे गु.र.न. २१९/२०२१ कलम ३०२ ३०७ भा.द.वि.प्रमाणे गुन्हा नोंद केलेला होता. सदरचे प्रकरण सह जिल्हा व सत्र न्यायालय, उदगीरचे न्यायाधीश.श्री डी.पी. सुभेदार साहेब यांच्या न्यायालयात चालविण्यात आले सरकार पक्षातर्फे एकूण १३ साक्षीदार तपासण्यात आले सदर प्रकरणात माननीय न्यायाधीश श्री डी.पी सुभेदार यांनी आरोपीस सश्रम करावासासह जन्मठेप व पाच हजार रुपये आर्थिक दंड भरण्याची शिक्षा दिली सरकार पक्षातर्फे फिर्यादी तर्फे अँड. एस.एम. गिरवलकर यांनी काम पाहिले व सदर प्रकरणात सहाय्यक सरकारी वकील म्हणून अँड.विष्णू लांडगे यांनी काम पाहिले.मयताच्या कुटुंबाला न्याय मिळवून दिल्याबद्दल सरकारी वकील अँड.शिवकुमार गिरवलकर व सह्याक सरकारी वकील अँड.विष्णू लांडगे यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.



आष्टी:खुंटेफळ साठवण तलाव सिंपोरा ते खुंटेफळ पाईपलाईन निविदा निघाल्याबद्दल जलसंपदाचे इंजि.श्री स्वागत क्षीरसागर यांचा प्रतिनिधिक स्वरूपात सत्कार करताना श्री शिरीषभाऊ थोरवे ग्रामस्थ खुंटेफळ,डॉ.सुनील पारखे व यदु करडूले ....

### चारोळी

विसरून सारे दुखरे क्षण
उघडे ठेवू सताड दार
भरुनी अंतरी उनाड वारा
हसत आव्हाने करूया पार .

रंजना सानप
मायणी (सातारा)

# जिल्ह्यातील पेट्रोल पंपावर पेट्रोल डिझेलची कमी पडू देणार नाही-जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर

## जिल्ह्यातील सर्व पेट्रोलपंप सुरळीत सुरु करण्यासाठी प्रशासन सज्ज

**दैनिक लोकनेता न्यूज नेटवर्क**
**हिंगोली (भगवान जाधव)**



भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, हिंदुस्थान पेट्रोलियम व इंडियन ऑईल कार्पोरेशन या तेल कंपन्यांच्या रिफायनरीमध्ये एलपीजीची वाहतूक करणारे वाहनचालक तसेच इतर पेट्रोलियम पदार्थांची वाहतूक करणारे वाहतुकदार यांनी संप पुकारला आहे. त्यामुळे पेट्रोल, डिझेल व इतर पेट्रोलजन्य पदार्थ यांच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर परिणाम होऊन सामान्य नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी जिल्ह्यातील भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचे १९, हिंदुस्थान पेट्रोलियमचे २१ व इंडियन ऑईल कार्पोरेशनचे १९ असे एकूण ५९ पेट्रोलपंप कार्यरत आहेत. वरील तिन्ही पेट्रोल कंपन्यांच्या समन्वयकाशी संपर्क साधला असून पेट्रोल व डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरु करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.

आज जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, पेट्रोलपंप चालक संघटना यांच्या प्रतिनिधींशी तातडीने बैठक घेवून पेट्रोलपंप सुरळीत सुरु करण्यासाठी सुचना दिल्या आहेत. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी श्री. पापळकर यांनी तालुकानिहाय पथके तयार करण्याच्या सुचना देवून या पथकामार्फत कोठेही काळाबाजार होणार नाही यासाठी लक्ष ठेवण्याचे आदेश दिले आहेत. वरील सर्व कंपन्यांच्या रिफायनरीमध्ये एलपीजीची वाहतूक करणारे वाहनचालक व वाहतूकदार यांच्याकडून कुठलाही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्थेमध्ये कुठल्याही प्रकारची बाधा येऊ नये तसेच पेट्रोलपंप व एलपीजी वितरणाच्या ठिकाणी तसेच पेट्रोल, डिझेल व एलपीजी वाहतुक करणा-या वाहनांना कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी आवश्यक पोलीस संरक्षण पुरविण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत कुठलाही अनुचित प्रकार घडल्यास अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत जीवनावश्यक वस्तू म्हणून अंतर्भाव होत असल्याने संबधित अधिनियमांतर्गत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, हिंगोली यांनी संबंधितांना दिलेल्या आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणा-या व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांच्यावर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ तसेच भारतीय दंड सहिता (४५ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतुदीनुसार दंडनिय कायदेशीर कार्यवाही करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी श्री. पापळकर यांनी आदेशाद्वारे दिले आहेत.

# प्रिय आईस,

लोकनेता न्यूज नेटवर्क

तुझ्या लाडक्या लेकीचा सप्रेम दंडवत.आई आज मी तुला घरातल्या घरात पत्र लिहीत आहे याचे तुला आश्चर्य वाटत असेल,परंतु आज मला याची नितांत गरज वाटत आहे. बाबांशी बोलू शकत नाही असे नक्कीच नाही,कारण मी त्यांची लाडकी परी आहे.परंतु आज मी माझे मन एक बाई म्हणून तुझ्याशी मोकळे करू इच्छिते कारण तू माझी आई आणि सगळ्यात जवळची सखी सुद्धा आहेस.

माझी तुम्हाला खूप काळजी आहे याची जाणीव मला आहे. परंतु आज तुमची अति काळजी करणेच मला मोठी अडचण वाटायला लागली आहे.काल बाबा बोलत होते,त्यावेळी मी पण ऐकले,परंतु गरजेचे नाही जे एकीबरोबर घडले ते माझ्याबरोबर होईलच.आई तुमच्या संस्कारांवर विश्वास ठेवा. कोणी एकानं केलेल्या चुकीची शिक्षा मला पण देऊ नका.

काल बाबा माझ्या लग्नाबद्दल बोलत होते.कोणता मुलगा मला पाहायला येणार असं सांगत होते.आई तूच विचार कर तुझही लग्न वयाच्या पंधराव्या वर्षी झालं होतं किती अडचणी आल्या नंतर तुझ्या आयुष्यात! शरीराबरोबर मनाची तयारी झाली होती का तुझ्या? बालपणी लग्न अवेळी बाळंतपण त्याचा परिणाम आज तुझं शरीर तुला सांगायला लागलंय.सारखी आजारी असतेस आणि तरीही तुला माझं लग्न याच वयात लावायचे आहे का ग?

आई मला माहित आहे आज समाजात मुली आणि महिलांच्या बाबतीत घडणाऱ्या घटना ऐकून तुझं मन भयभीत झालं असेल.कदाचित मी आता मुलगी नाही,जबाबदारी सुद्धा वाटायला लागले असेल.परंतु खरे सांग आई कमी वयात लग्न लावून दिल्याने होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या घटना खरंच थांबणार आहेत का? की थांबल्या आहेत.बलात्कारी नरपिसशाच्यांना विवाहित अविवाहित असे काहीच कळत नाही ग.त्यांना दिसतो तो फक्त स्त्री देह त्यामुळेच कितीतरी महिला बदनामीच्या भीतीपोटी तक्रार सुद्धा करत नाहीत. निमुटपणे सगळं सहन करत रहातात.लग्न लावून फक्त घर बदलू शकते,मानसिकता नाही.

आई मला खूप शिकायचे आहे जे दुःख तुझ्या वाट्याला आले आहे,त्याची झळ आम्हीही सोचली आहे.तुझ्या मनाच्या वेदना मी पण अनुभवल्या आहेत.आता मात्र या सगळ्यातून बाहेर पडण्याची वेळ आली आहे.त्यासाठी मला माझा वेळ दे.माझे शिक्षण पूर्ण करण्याची संधी मला दे.कारण तेच माझ्या कठीण काळात माझी ढाल बनवून माझ्याबरोबर असेल.

आई तुला कशाची भीती वाटत आहे?आपली मुलगी चुकेल याची.परंतु ज्ञानाने ती समजदारी नक्कीच माझ्यात आली आहे.कोणताही निर्णय तुमच्या परवानगीशिवाय मी घेणार नाही.तुम्ही माझे जन्मदाते आहात माझ्या श्वासावर तुमचा अधिकार आहे.परंतु कोणाच्याही सांगण्यात न येता माझी जागा मला निर्माण करू द्या. शेवटी लग्न हा प्रत्येक मानवाचा न टाळता येणाऱ्या संस्कार आहे.परंतु त्यासाठी मला मन आणि शरीर या दोन्हीही बाजूंनी तयार होऊ द्यात.त्यानंतर मी हसत हसत बोहल्यावर चढेल. परंतु भीतीपोटी मला दुःखाच्या खाईत अवेळी ढकलण्याचे पाप करू नका.दहावीनंतर जर तुम्हाला मला शिकवायचे नसेल तर पुढची दोन-तीन वर्ष मला तुमच्या बरोबर राहू द्या.कोणते तरी एखादे जीवन कौशल्य मला शिकून घेऊ द्या ज्याचा मला पुढील जीवनात उपयोग होईल. तोपर्यंत माझी वयाची १८ वर्षे देखील पूर्ण होतील आणि बालविवाहाच्या पापापासून तुमची देखील सुटका होईल.

आई आज जग खूप बदलले आहे ग.मलाही उंच भरारी घ्यायची आहे पायलट होण्याचे माझे स्वप्न आहे. विमानातून ढगांना स्पर्श करायचा आहे.जग फिरायचे आहे. यासाठी,माझ्या स्वप्नांसाठी तू बाबांना समजावून सांग.वेळेच्या अगोदर झालेला विवाह बेडीच ठरणार माझ्या स्वप्नांना कैद करणारी.आज अनेक मुली बालविवाहाच्या आगीत लोटल्या जात आहेत.त्या आगीत कितीतरी बुद्धिमान डॉक्टर, इंजिनियर,वकील,जिल्हाधिकारी आणि हो उत्कृष्ट गृहिणी यांचा बळी चालला आहे.

आई तुला मनी आठवते का ग? माझी बाल मैत्रीण तिचाही बालविवाह झाला होता.परंतु अवघ्या एका वर्षातच तिचा मृत्यू झाला. कारण बाळंतपणाचा त्रास तिला सहन झाला नाही आणि आपली नंदा तिला तर सासरच्या दारातच आई-वडिलांनी अग्नीडाग दिला होता.दोन्हीही बालविवाह किती वेदना सहन केले असतील नाही दोघींनी. तुलाही वाटते का की मी दुसरी मनी किंवा नंदा व्हावं?




हे सर्व थांबायला हवे आणि त्याची सुरुवात तू रागिनी बनवून आपल्या घरापासूनच कर कारण माझ्या आजच्या वादळी परिस्थितीत तूच माझी ढाल आहेस.भविष्यात येणाऱ्या वादळाला तूच थांबू शकतेस कारण तू माझी आई आहेस....तुझीच लाडकी

**लेखन:डॉ.चव्हाण अनिता**
**स.शि.जि.प.मा.शा.आष्टा(ह.ना)**

# आद्य क्रांतिकारी शिक्षिका सावित्रीबाई फुले!

लोकनेता न्युज नेटवर्क

माती आणि माता नसती तर काय झाले असते? काहीच उगवले आणि कुणीच जन्मले नसते. माय-मातीच्या जीवघेण्या त्यागावर संपूर्ण विश्वाचा डोलारा उभा आहे. या दोघींचं रुजवणं आणि उगवणं अविरतपणे सुरु आहे, ही आपल्यासाठी मोलाची बाब! जगाच्या आरंभापासून ते अंतापर्यंत जिच्यामुळे सर्वकाही घडून येत असतांना तिच्या नशिबी मात्र नित्य उपेक्षाच! तुम्हाला मला जन्म देणाऱ्या मायनं शेतीचा शोध लावला, सर्वच पुरुषांना शिकवणारी ती आद्य शिक्षिका! स्त्री शक्तींचा इतिहास मोठा देदीप्यमान आहे! आत्तापर्यंत अनेक महान मातांनी आपल्या जीवाचं बलिदान देऊन इथली क्रांतीची मशाल अखंड तेवती ठेवली आहे. याच महान धुरंधर स्त्रियांच्या तजोमय रांगेत सदैव अग्रस्थानी उच्चारले जाणारे नाव म्हणजे आद्य स्त्री शिक्षीका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले! इतिहासातील महान मातांच्या नावांचा उल्लेख झाला की; अंगावर शहारे येतात. आपल्या पोटच्या गोळ्यासाठी स्वतःच्या जीवाची बाजी लावणाऱ्या, अशक्य असा गड सर करणाऱ्या हिरकणी या महान मातेची कहाणी जशी मोठ्या सन्मानाने सांगितली जाते तशीच इथला सामान्य माणूस जगला-स्वावलंबी-आत्मभान असणारा झाला पाहिजे यासाठी अहोरात्र झगडून आपले साम्राज्य उभारणाऱ्या राजमाता, राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब, रणरागिणी माता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या आणि अन्य शक्तिशाली स्त्रियांचा गौरव नित्य झाला आहे आणि अचंद्रसूर्य होत राहिल!सावित्रीबाई फुले यांचा इतिहास आणि कार्य केवळ एका लेखात लिहून बंदिस्त होणारे नाही. त्यांचा जीवनपट अनंत आव्हाने आणि खडतर वळणांनी भरलेला आहे. या महामानवांची चरित्रे आणि चारित्र्य नीट तपासून पहिले असता, आपण काय करत आहोत? आपल्या भोवताल आणि एकूणच देशाच्या उभारणीत आज आपले योगदान काय? या प्रश्नांची उत्तरे शोधतांना आपले आपल्यालाच हसू आल्याशिवाय राहणार नाही. केवळ नऊ वर्षे वयाच्या सावित्रीबाई तेरा वर्षाच्या ज्योतीराव फुल्यांबरोबर सून म्हणून घरात आल्या. सावित्रीबाईंच्या वडिलांच्या घरी पाटीलकी होती. नेवसे गावचे पाटील असलेले वडील श्री विठ्ठलराव यांनी आपल्या लेकीवर शिक्षणाचे संस्कार रुजवले होते. माहेरावरून येतांना सावित्रीबाई ख्रिश्चन मिशनरींनी दिलेले एक पुस्तक सासरला घेऊन आल्या. अगोदरच वेगळे काहीतरी करण्याचे वेड असलेले त्यांचे पती ज्योतीराव फुले ते पुस्तक वाचून आणखीनच बदलले. त्या काळात सर्वत्र क्रांतिकारी विचारांचे वारे जोरात वहात होते. एकोणिसावे शतक म्हणजे जगभर सुरु असलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता संबंधाने सुरु असलेल्या चळवळी! दुसरीकडे भारतात धर्माचा समाजमनावर खोलवर प्रभाव झाला होता! कट्टर वर्णव्यवस्था, जातीभेद यांनी भारताचा तळ गढूळ झाला होता. समाजव्यवस्थेच्या अनंत चिरकाळ्या झाल्या होत्या. खऱ्या धर्माला ग्लानी आली होती. अनेक शतकापासून चालत आलेला वारकरी संप्रदाय केवळ मंदिरात बंदिस्त झाला होता. यारे यारे लहान थोर हा वारकरी विचार मावळला होता. ज्ञानोबा-तुकोबांचे अभंग ऐकू येत नव्हते. सगळीकडे भोंदू-बाबांचा सुळसुळाट झाला होता. असे असतांना युवा ज्योतीराव फुले काहीतरी वेगळे करण्याचा विचारात असायचे. सत्यनारायणाची कथा मोठ्या भावभक्तीने ऐकणारा समाज आपल्या घरातील बालविधवा सूनेला सती पाठवायला अथवा तिचे केशवपन करून तिला बंदिस्त कोठडीत टाकायला मागेपुढे पहात नव्हता. आपल्या भोवतालची प्रचंड विषारी विषमता, गरिबी, दारिद्र्य, उपासमार, स्त्रियांचा प्रचंड छळ इत्यादी पाहून ज्योतीराव मनोमन व्यथित व्हायचे! नवविवाहित असतांना प्रेमाच्या गप्पात मशगुल न होता रात्र रात्र याचाच अखंड विचार करत राहायचे. यासाठी आपण काहीतरी केलं पाहिजे? हा सवाल त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता.असे विचारांचे वादळ सुरु असतांना सावित्रीबाई पंधरा सोळा वर्षाच्या झाल्या. भोवताल अनेक बाल विधवा, केशवपन केलेल्या, घरात बंदिस्त असणाऱ्या युवा भगिनी पाहून यांच्यासाठी काहीतरी करायला हवे. यांना लिहायला, वाचायला शिकवायला पाहिजे असे ज्योतीरावांना मनोमन वाटायचे, मात्र यांना शिकवायला स्त्री शिक्षिका कुठून आणायची? हा फार मोठा यक्ष प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला आणि हा प्रश्न आपल्या घरातूनच सोडवायचे त्यांनी ठरवले.





प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो.९१५८०६४०६८

आपली पत्नी सावित्रीबाईंना लिहायला-वाचायला आणि शिकवायला शिकवायचे असे ज्योतीरावांनी ठरवले. हे फार मोठे क्रांतिकारी पाउल होते! चूल आणि मूल विचारसरणीत अडकलेला बुरसटलेला समाज हे स्वीकारेल का? याचा तिळभर विचार न करता ज्योतिबा कामाला लागले आणि त्यांच्या युवा पत्नी सावित्रिबाईंनी त्यांना खंबीर साथ द्यायचे ठरवले! त्यानंतरचा त्या दोघांचा संपूर्ण जीवनपट मोठा क्रांतिकारी ठरला.ज्योतीराव-सावित्रीबाई यांनी १८४८ साली मुलींची पहिली शाळा पुण्यात काढून आपल्या क्रांतीचे रणसिंग फुंकले. अगोदर आपल्या घरातील पाण्याची विहीर सर्व समाजासाठी खुली करून क्रांतिकारी कार्याला ते सामोरे गेलेच होते. मुलींच्या शाळेत जातांना सावित्रीबाईंना कुजलेल्या समाजाने अतोनात छळले. शिव्यांची लाखोली, त्यानंतर शेण, चिखल, सडकी अंडी आणि एवढ्यावरही काम थांबले नाही तेंव्हा चांडाळानी सावित्रीबाईंना अक्षरशः दगड मारले. त्यात सावित्रीबाई रक्तबंबाळ झाल्या. एवढे होऊनही त्यांनी आपले काम थांबवले नाही. अविरतपणे आपले काम करतांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. अंगावरील एका लुगड्याचे दोन तुकडे करून एक अंगावर शेण-चिखल-सडकी अंडी झेलण्यासाठी आणि दुसरे शाळेत गेल्यावर शिकवण्यासाठी वापरले!

शिक्षणाचे काम सुरू असतांना ज्योतीरावाकडून लेखनाचे बाळकडू घेतले आणि एकही दिवस शाळेत न गेलेल्या सावित्रीबाई लेखिका, कवयित्री झाल्या. काव्यफुले (काव्य संग्रह), सुबोध रत्नाकर, सावित्रीबाईंची गाणी, बावनकशी इत्यादी चार महत्वपूर्ण ग्रंथ उपलब्ध आहेत. शाळेशिवाय

ज्ञान नाही विद्या नाही, ते घेण्याची गोडी नाही
बुद्धी असुनी चालत नाही, तयास मानव म्हणावे का?

असे रोखठोक काव्य लिहून समाजाची कानउघाडणी करणाऱ्या सावित्रीबाई फुले ह्या केवळ वर्गातीलच नाही तर समाजातील लोकशिक्षक झाल्या. या शिवाय त्यांचे विचार फारच प्रगल्भ आणि दिशादर्शक होते. ज्योतीरावांचे निधन झाल्यानंतर दत्तक पुत्राला प्रेताग्नी देण्यास विरोध झाल्यानंतर सर्व रीतीरिवाज झुगारून स्वतः आपल्या पतीच्या सरणाला प्रेताग्नी देण्याचे क्रांतिकारी पाऊल त्यांनी उचलले. असे असतांना पुण्यात भयंकर प्लेगची साथ आली. स्वतःला झोकून देऊन प्लेगग्रस्त लोकांना दवाखान्यात नेण्याचे काम केले. यातच प्लेगची लागण होऊन वयाच्या ६६ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. एका क्रांतिकारी, कृशील, समाज ऋण फेडणाऱ्या महान मातेचा अंत झाला.बंधू-भगिनींनो, आज आपण स्वातंत्र्याच्या शंभरीकडे जातांना काय करत आहोत? आज चळवळी कुठं आहेत? आज शिकेलेली मंडळी काय करत आहे? उच्च शिक्षित स्त्रिया काय वाचत, लिहित, बोलत आहेत? असे एक ना अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे आहेत. तासनतास मोबाईलच्या निर्जीव काचावर बोटं चाळवून थकलेला तरुण वर्ग काय चिंतन करतोय? आयोगावर आयोग घेऊन शिक्षणाची अवस्था काय झाली आहे? असे अनंत प्रश्न आज महान कवयित्री सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी मला सतावत आहेत. मी माझे थेंबे थेंबे काम करतो आहे, आपणही फूल नाही फुलाची पाकळी या नात्याने प्रबोधन, समाज ऋण फेडण्याचे कार्य करावे हीच माफक अपेक्षा! जय क्रांतीज्योती सावित्रीबाई!

# सरकार मायबाप चालक मालक चे घर उध्वस्त करण्यापेक्षा दारू कारखाने उधवस्त करा;रस्त्यावर अपघातास नियंत्रण राहील!

लोकनेता न्यूज नेटवर्क
बीड, विजय रोडे

केंद्र सरकरने आणलेल्या वाहन कायद्याच्या विरोधामध्ये ट्रक, टँकर, जीप चालकांनी देशव्यापी संप सुरू केला असल्याचं पाहायला मिळत आहे. चालक आणि मालक याच्या कडे जर १०लाख रु, मोजण्या इतपत असती तर चालक म्हणून रोजनदारी केली नसती, हा कायदा म्हणजे सामान्य होतकरू लोकांचा घरे उधवस्त होणारा असून हा जाचक कायदा रद्द करा, चालक म्हणजे जाणीव पूर्वक कोणाच्या जीवाशी खेळत नसून अपघात हा अपघात असतो, बरेच वाहन मालक हे आपल्या बापाची शेती विकून वाहन जुने पाणे वाहन घेऊन आपला उदरनिर्वाह भागवत असतात, त्याच्या मुलांचे शैक्षणिक खर्च पेलत आहेत,मोटर सायकल, ऑटो, चालक, रोडवरील पादचारी जर मध्यपान करून रोड वर लेझिम खेळत असतील तर अचानक वाहना समोर पडत असेल तर त्याला जबाबदार सरकार आहे की नाही,मध्यपान करून जर रोड वर वाकडं तिकडे चालत असेल, किंवा मध्यपान करून वाहन चालवत असतील त्याला कोणता कायदा लावला, त्याची किती अंमलाबजावणी ही निदर्शनास आणून तर दाखवा! यासाठी अगोदर दारूबंदी कायदा अंमलात आणा त्यासाठी हा जाचक कायदा लागू करा, चालक याच्या रोजी रोटी वर बाधा आणू नका,१ जानेवारी दिवशी नवी मुंबईमध्ये ट्रक चालकांनी आंदोलन केलं होतं. यावेळी काही पोलिसांनी आंदोलनामध्ये मध्यस्ती केली असता पोलिसांवर दगडफेकीचा प्रकार घडला असल्याची माहिती समोर येत आहे. अशातच आता या आंदोलनाचा विपरीत परिणाम पेट्रोल पंपांवर होत आहे. ट्रक चालक आंदोलन करत असल्याने पेट्रोल पंप ठप्प आहेत. पेट्रोल, डिझेलचा तुटवडा होऊ शकतो मात्र पंप बंद राहणार नाही, अशी माहिती समोर येत आहे. इंधन पुरवठा विस्कळीत झाल्याने संपामुळे हजारो टँकर डेपो बाहेर थांबले आहेत. याबाबत सोमवारी बैठक घेण्यात आली होती. मात्र त्याचा कोणताही फायद झाला नाही.

३ जानेवारीपर्यंत हा संप राहणार असून त्याचे विपरीत परिणाम आता जाणवू लागले आहेत. ट्रक चालकांच्या आंदोलनामध्ये आता टँकर चालकांनी उडी घेतली आहे. दुसरीकडे हा संप लांबल्यास एसटी महामंडळाच्या वाहतुकीवरही इंधन अभावी परिणाम होऊ शकतो. पेट्रोल तसेच डिझेलचा तुटवडा पडण्याची दाट शक्यता असल्याने पेट्रोल पंपाबाहेर मोठ्या प्रमाणात वाहनचालकांनी रांगा लागल्या आहेत. संपाचा परिणाम हा आता राज्यभर होत आहे. इंधन पुरवठा हा मनमाडहून उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भामध्ये होतो. मात्र मनमाडला इंधन पुरवठा ठप्प असल्याने उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भामध्ये इंधन पुरवठा करणं अवघड होईल.या कायद्या विरोधी उद्या परळी येथे रस्ता रोको चक्का जाम आंदोलन होणार असून यात सर्व चालक मालक उपस्थितीत राहणार असल्याचे समजते!




## उप जिल्हा रुग्णालय वसमत येथे प्रथमच नेत्र शस्त्रक्रिया यशस्वी

# रुग्णालयात लवकरच डायलिसिस व सी टी स्कॅन सुविधा सुरू करणार-डॉ गंगाधर काळे

दैनिक लोकनेता न्यूज नेटवर्क
हिंगोली भगवान जाधव

मा जिल्हा शल्य चिकित्सक डॉ नितीन तडस यांच्या मार्गदर्शना खाली दिनांक २ जानेवारी मंगळवार रोजी उप जिल्हा रुग्णालय वसमत येथे वैद्यकीय अधिक्षक डॉ गंगाधर काळे यांच्या नेतृत्वाखाली तबल १० वर्षे नंतर बंद पडलेले नेत्र शस्त्रक्रिया गृह पुन्हा सुरू करण्यात आले, श्री दगडू संभाजी कांबळे, वय ६६ वर्ष राहणार चौंढी अंबा यांची प्रथमच डाव्या डोळ्याच्या मोतीबिंदू ची नेत्र शस्त्रक्रिया यशस्वी पणे करण्यात आली. सदर नेत्र शस्त्रक्रिया हि डॉ सुनील गुडेवार , नेत्र रोग तज्ञ यांनी केले, त्यावेळी नेत्र चिकित्सा अधिकारि श्री विनोद सरोदे,भूलतज्ञ डॉ माणिक मसारे आणि सर्व शस्त्रक्रिया गृहातील कर्मचारी उपस्थीत होते.

वैद्यकीय अधिक्षक डॉ गंगाधर काळे यांनी उप जिल्हा रुग्णालय वसमत येथे रूजु झाले नंतर रुग्णालयातील नादुरूस्त होऊन बंद पडलेले स्वच्छता गृह दुरूस्त करून घेतले त्यामुळे आंतर रूग्ण संख्येत लक्षणीय वाढ झाली, त्यानंतर डॉ गंगाधर काळे यांनी १० वर्षे बंद पडलेली शस्त्रक्रिया गृह, त्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञान आणि वातानुकूलित यंत्रणा बसवून घेतले आणि एकाच वर्षात ३२५ कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया व मोठ्या शस्त्रक्रिया यशस्वी पने करण्यात आल्या. रूग्ण संख्येत लक्षणीय वाढ झाली तर त्यांना स्वच्छ पिण्याच्या पाण्या साठी रुग्णालयातील पाणी शुद्धीकरण यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली, त्यामुळे रुग्णांना रुग्णालयामध्येच शुद्ध पाणी पिण्यासाठी ऊपलब्ध झाले आहे उ--ी सारखी अतिउच्च दर्जाचे तंत्रज्ञान उप जिल्हा रुग्णालय वसमत येथील शस्त्रक्रिया गृहात नादुरुस्त होते, ते डॉ गंगाधर काळे यांनी सतत पाठ पुरावा केल्या मुळे ते दुरूस्त करून घेवुन कार्यान्वित करण्यात आले.लवकरच डॉ गंगाधर काळे यांच्या कुशल नेतृत्वाखाली उप जिल्हा रुग्णालय वसमत येथे प्रथमच डायलिसिस सुविधा सुरु करण्यात येणार असून त्यामुळे डायलिसिस साठी वसमत वासियांना व तालुक्यातील गोर गरीब, गरजवंत रुग्णांना बाहेर गावी जाऊन उपचार करण्याची गरज पडणार नाही असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. त्याचबरोबर डॉ गंगाधर काळे यांच्या सतत प्रयत्नामुळे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संपर्कामुळे उप जिल्हा रुग्णालय वसमत येथे उढ ीलरप सारखी अत्याधुनिक तंत्रज्ञान लवकरच येणार असून त्यामुळे गोर गरीब, कष्टकरी , कामगार,शेतकरी , यांची सोय होऊन आर्थिक भुर्दंड बसणार नाही , मोठ्या शहरात जाण्याची गरज पडणार नाही व रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे,




# बारामती लोकसभा व इंदापूर विधानसभा निवडणुकीचा द स्टेलेमा संसथेने केला मतदारांचा सर्वे

## विद्यमान आमदार व खासदारांच्या कामगिरीचा जाणून घेतला जनतेकडून कल

लोकनेता न्यूज नेटवर्क
इंदापूर पुणे: ( बबनराव धायतोंडे)

आगामी काळातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात सर्वसामान्य लोकांचा कल जाणून घेण्यासाठी भिगवण येथे मंगळवार ( ता.२) रोजी सर्वे करण्यात आला पुण्याच्या द स्टेलेमा संस्थेच्या वतीने सचिन काळजाते यांनी हा सर्वे केला. त्यांच्याकडून अधिक माहिती घेतली असता त्यांनी सांगितले की, आमच्या संस्थेच्या माध्यमातून संपूर्ण इंदापूर विधानसभा व बारामती लोकसभा या मतदारसंघाचा आम्ही सर्वे करत आहोत. यावेळी सर्वसामान्य लोकांच्या भावना त्यांनी जाणून घेतल्या. तालुक्यातील सामाजिक राजकीय परिस्थितीची त्यांनी सर्वसामान्य लोकांच्यातून माहिती घेतली तसेच तालुक्यातील विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे व बारामती लोकसभेच्या विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्या कामगिरी विषयी चौकशी केली. तसेच भविष्यात जनतेचा कौल कुणाच्या बाजूने असल्याचे त्यांनी जाणून घेतले यावेळी विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील व तालुक्यातील भावी आमदार म्हणून राजकीय एन्ट्री करत असलेले प्रवीण माने यांच्या विषयी लोकांनी आपली मते सांगितली. तसेच बारामती लोकसभा मतदार संघाच्या विद्यमान खासदार सुप्रिया सुळे तसेच मागील पंचवार्षिक निवडणूक लढविलेल्या भारतीय जनता पार्टीचे दौंडचे विद्यमान आमदार राहुल कुल यांच्या पत्नी कांचन कुल व संभाव्य उमेदवार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार त्याच बरोबर माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या अंकिता पाटील ठाकरे यांच्या उमेदवारी विषयी त्यांनी मतदारांची मते जाणून घेतली. त्यामध्ये भिगवण ता. इंदापूर येथील फेमस असलेला अरुणोदय चहा येथिल अनेक नागरिकांनी बारामतीच्या विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांचे बाबत उघडपणे सांगितले की सध्या तरी सुप्रियाताई सुळे याच निवडणूक जिंकतील.



# मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत १३ कोटींच्या ठिगळाच्या रस्त्यावर गुडघाभर भगदाड-डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**पाटोदा/प्रतिनिधी**

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड यांच्या मार्फत पालवण चौक ते लिंबागणेश रस्त्यावर १२ कोटी ७५ लाख रुपये निधी खर्च करण्यात आला. मात्र ठेकेदार कंपनीने निकृष्ट रस्ता काम केल्याने २ वर्षातच रस्त्याचे तिन तेरा वाजल्याचे दिसत आहे. महायुती सरकारच्या कार्यकाळात तत्कालीन ग्रामविकास मंत्री
पंकजाताई मुंडे यांनी ग्रामविकास मंत्री असताना ग्रामीण भागातील दळण वळणाची साधने म्हणून मोठ्या प्रमाणावर निधी आणला त्यातुन ताईंच्या कार्यकर्ते यांनी निकृष्ट दर्जाची कामे करून निधी घशात घातला. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या तक्रारीनंतर रसत्याला ठिगळ लाऊन थातुरमातुर डागडुजी करण्याचा प्रयत्न सुरूच आहे. पालवण चौक भाळवणी मार्गे ते लिंबागणेश हा २४ किलोमीटर रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड या विभागामार्फत अंदाजे किंमत १३ कोटी रूपयांच्या खर्चातुन केला असुन हा रस्ता एम.टी.मस्के कन्स्ट्रक्शन मार्फत करण्यात आला असुन भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचे थोरले बंधु मदन मस्के यांनी केलेला असुन २ वर्षातुन ३ वेळा डागडुजी करण्यात आली आहे. एम.टी.मस्के कन्स्ट्रक्शन चे खडीक्रशर याच रस्त्यावर असल्याने आणि निकृष्ट दर्जाचा रस्ता केलेला असुन रस्त्याची अशी दुरावस्था झाली आहे. लिंबागणेश सर्कल मधील ग्रामस्थांनी पालवण चौकात रास्ता रोको आंदोलन केले होते. वरील निकृष्ट दर्जाच्या रस्ता प्रकरणी कंत्राटदार आणि महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास यंत्रणा बीड अभियंता यांच्या वर चौकशी करून कारवाईसाठी दि.७ ऑगस्ट-२०२३ रोजी या मार्गावरील ग्रामस्थांनी पालवण चौकात पालवण, आहेर धानोरा, वरवटी, भाळवणी, पोखरी (घाट), पिंपरी, बेलेश्वर, सोमनाथ वाडी येथील ग्रामस्थांनी रास्तारोको आंदोलन केले होते. या वेळी स्वप्निल गलधर, बबन माने, गणेश बहिरवाळ, अर्जुन बहिरवाळ, सचिन कोटुळे, बप्पासाहेब फाळके, प्रदीप कोटुळे, पंडीत तुपे, अशोक येडे, नितिन सोनावणे, शेख युनुस, विठ्ठल गुजर, प्रकाश फाटक, मधुकर पाटील, शेख अख्तर सह ग्रामस्थ मोठ्या सहभागी झाले होते.





लिंबागणेश ते पालवन रस्त्यावरील लिंबागणेश परीसरात रस्त्याच्या कडेला गुडघाभर भगदाड पडले असुन रस्त्याची डागडुजी करताना जाणिवपूर्वक या कडे दुर्लक्ष केल्याने भविष्यात दुर्दैवी अपघाताची घटना घडल्यास कंत्राटदारावर गुन्हे दाखल करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी असे सामाजिक कार्यकर्ते गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सांगितले.

# कुकडी येथील परंपरा कायम, जिल्हा परिषद शाळा कुकडी येथील शालेय समिती बिनविरोध

## अध्यक्षपदी श्याम भाऊ बालू पाटील, तर उपाध्यक्षपदी अंकुश पुंडलिक बोराडे यांची बिनविरोध निवड



**लोकनेता नेटवर्क न्यूज । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील कुकडी या गावातील परंपरा कायम शालेय समिती निवड बिनविरोध करतात. अध्यक्षपदी श्याम बालू पाटील, उपाध्यक्षपदी अंकुश पुंडलिक बोराडे, सदस्य पदी सारिका रतन साळवे, अनिता पांडुरंग सोनवणे, अंकुश वाळूबा दळवी, उमा किशोर एकडे, वैशाली शंकर साळवे, गीता आत्माराम जाधव, रेणुका देविदास निकम, ग्रामपंचायत सदस्य ईश्वर पाटील बोराड, शिक्षण प्रेमी सुनील साहेबराव जाधव, यांची बिनविरोध निवड करण्यात आली तर या निवडी प्रसंगी उपस्थित मान्यवर प्राध्यापक अशोक चिंचपूरे, सहशिक्षक विशाल सर बुडके, तसेच उपस्थित ग्रामपंचायत सदस्य भास्कर भाऊ निकम, अंगणवाडी सेविका, उपस्थित होत्या सर्वांचे अभिनंदन या निवडीबद्दल जिल्हा परिषद सदस्य विठ्ठल दादा चिचपुरे, सरपंच नितीन देवकर, उपसरपंच रवि लव्हाळे, व ग्रामपंचायत सदस्य पोलीस पाटील अनिल लव्हाळे या सर्वांनी अभिनंदन केले.

**कुकडी हे गाव छोटस गाव असून एका**



**विचाराचं गाव आहे हे पुन्हा सिद्ध झाले आहे जिल्हा परिषद शाळा कुकडी येथे शाळा स्थापन झाल्यापासून बिनविरोध समिती कायम झालेले आहे त्याबद्दल मी सर्व पालकांचे गुरुजनांचे ग्रामपंचायत च्या वतीने अभिनंदन करतो..**

**ग्रामपंचायत सदस्य वाकडी कुकडी, तथा भारतीय जनता पार्टी तालुका उपाध्यक्ष..**

# हुतात्मा भाई कोतवाल यांना अभिवादन !

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**माथेरान(चंद्रकांत सुतार)**

माथेरानच्या वीर सुपुत्राने अण्णासाहेब उर्फ भाई कोतवाल यांनी दि.२ जानेवारी १९४३ याच दिवशी ब्रिटिश सरकारच्या विरोधात रणशिंग फुंकून हौतात्म्य पत्करून आपला देह भारतमातेच्या कामी आणला होता.वीर हुतात्मा भाई कोतवाल यांच्या ८१ व्या पुण्यतिथी निमित्ताने त्यांना अभिवादन करण्यासाठी पहाटे साडेपाच वाजता नौरोजी उद्यानातून मशाल फेरी काढण्यात आली. त्यानंतर सहा वाजून दोन मिनिटांनी नौरोजी उद्यानातील भाई कोतवाल यांच्या अर्ध पुतळ्याला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक राहुल इंगळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. छत्रपती शिवाजी महाराज उद्यानातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्याला राहुल इंगळे यांच्या हस्ते पुष्पहार



अर्पण करण्यात आला. स्वातंत्र्य सैनिकांच्या स्तंभास स्वच्छता मुकादम अन्सार महापुळे यांच्या हस्ते पुष्पहार,वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेतील स्वर्गीय सुभेदार विनय धनावडे यांच्या शिल्पास स्वच्छता निरीक्षक नरेंद्र सावंत यांच्या हस्ते पुष्पहार, हुतात्मा स्मारक येथील भाई कोतवाल आणि वीर हुतात्मा हिराजी पाटील यांच्या प्रतिमेस गिरीश पवार यांच्या हस्ते पुष्पहार, स्वातंत्र्य सैनिकांच्या नामफलकास लक्ष्मण दरवडा यांच्या हस्ते पुष्पहार तसेच हुतात्म्यांच्या शिल्पास संडे कदम आणि वनिता दिघे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी गावातील नागरिक तसेच काही माजी लोकप्रतिनिधी, शालेय विद्यार्थी, नगरपरिषदेचे कर्मचारी वर्ग उपस्थित होते.शाळेत उत्तम वर्तन तसेच अभ्यासक्रमात उल्लेखनीय प्रगती असणाऱ्या इंग्रजी तसेच मराठी शाळेतील एकूण सहा विद्यार्थी,विद्यार्थीनिंना रायगड भूषण पुरस्कार प्राप्त शिक्षक नारायण सोनवणे यांच्या तर्फे आणि नगरपरिषदेच्या माध्यमातून प्रत्येकी एक हजार रुपये रोख आणि प्रशस्तीपत्रक मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या हस्ते यावेळी देण्यात आले. यामध्ये आदित्य लक्ष्मण दरवडा,झारा नईम पन्हाळकर ,उमर अनिस शेख, कार्तिकी भास्कर शिंदे ,स्वराज सचिन काळे ,प्रतीक्षा सुनील सकपाळ या विद्यार्थीना वाटप करण्यात आले.

# दर्पण पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी शेख निसार तर सचिव पदी सतीश कोल्हे



**लोकनेता नेटवर्क न्यूज**
**उमरखेड(सय्यद रहीम रजा )**

शहरातील दर्पण पत्रकार संघाची कार्यकारणी गठीत करण्यात आली यामध्ये अध्यक्ष म्हणून शेख निसार शेख इब्राहिम यांची निवड करण्यात आली तर सचिव पदी सतीश कोल्हे यांची सर्वनुमते निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष बंडू पाटील कदम सल्लागार म्हणून काझी चुनूमिया. डॉ. आयुबखा आमिर खा पठाण डॉ.आंबेजोगाईकर यांची निवड करण्यात आली तसेच कार्याध्यक्ष म्हणून श्री शेख जमीर कोषाध्यक्ष म्हणून संभाजी भोयर यांची निवड करण्यात आली यावेळी नितीन सोनाळे सय्यद रहीम रजा कैलास आडागळे बाळराज काळबांडे फरहान काझी इत्यादींची सदस्य म्हणून निवड करण्यात आली यावेळी असंख्य पत्रकार उपस्थित होते.

# केंद्र सरकारच्या नवीन ड्रायव्हर विरोधी हिट अ‍ॅन्ड रन कायदा रद्द करा

**लोकनेता नेटवर्क न्यूज**
**उमरखेड(सय्यद रहीम रजा )**

ऑल इंडिया वाहन चालक मालक महासंघ उमरखेड शाखा व्दारे दि. ०३/०१/२०२३ रोज बुधवार चक्काजाम करण्यात येणार आहे.कारण केंद्र सरकारच्या नवीन ड्रायव्हर विरोधी कायदा हिट अ‍ॅन्ड रन भारत न्याय संहिता २०२३ या कायद्याच्या विरोधात उमरखेड तालुक्यातील सर्व ब्रान्सपोर्ट युनियनच्या वतीने माहेश्वरी चौक या ठिकाणी सकाळी ११:३० ते १२:०० वाजेपर्यंत चक्का जाम आयोजित करण्यात येत आहे.या आंदोलनामध्ये ऑल इंडिया वाहन चालक मालक महासंघ यवतमाळ जिल्हा व इत्यादी सर्व विविध ट्रान्सपोर्ट संघटना व सर्व ाहन चालक मिळुन हा चक्काजाम आयोजित करण्यात येईल.सदरहु चक्काजाम नागपुर, वाशीम, हिंगोली, अकोला, अमरावती, नांदेड, यवतमाळ या ठिकाणी



सुध्दा होणार आहे.सदरहू आंदोलन हे शांततेच्या मार्गाने केल्या जाईल.अशी माहिती पोलीस स्टेशनला देण्यात आली.यावेळी अध्यक्ष सगीरे अहमद खान, रहीम खान पठाण, उपाध्यक्ष अ.समद अ.सलाम, कोषाध्यक्ष शेख मुजीब शेख मुस्तफा, शेख अहमद शेख मुस्तफा पटेल, सल्लागार रहीम शेख रहीम शेख महेमुद राज यांच्या ऑल इंडिया वाहन चालक मालक महासंघ उमरखेड चे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेरी बु येथिल ३९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची ह.भ.प रघुनाथ महाराज धामणगावकर यांच्या काल्याच्या कीर्तनानी सांगता

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**आष्टी / राजू म्हस्के**

आष्टी तालुक्यातील शेरी बु येथे श्री श्रेत्रिय ब्राम्हनिष्ठ सद्गुरू श्री संत मदन महाराजांनी सुरू केलेल्या ३९व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते गेल्या सात दिवसापासून अतिशय मंगलमय वभक्तिमय वातावरणात दररोज सायंकाळी नामांकित महाराजांनी आपल्या मार्मिकपणे आपले हरिनाम कीर्तनाच्या माध्यमातून पंचक्रोशीतील भाविकांना अध्यामिक व सामाजिक जीवनात आपण कसे राहिले पाहिजे याचा मूल्यमंत्र देऊन समाजप्रबोधनाचे कार्य अतिशय उत्तम प्रकारे केले या सप्तहाची सांगता अतिशय भक्तिमय वातावरणात मंगळवारी दि.२ यादिवशी सकाळी भव्यदिव्य दिंडी प्रदक्षिणा काढली व ह.भ.प रघुनाथ महाराज धामणगावकर यांनी आजच्या कालाच्या हरि कीर्तनात समाज प्रबोधन करतांना सांगितले की, श्री क्षेत्रिय ब्रम्हनिष्ठ श्री संत मदन महाराज यांना सर्व प्रथम या गावात सर्वात अगोदर मी आणि वैकुंठवाशी रंगनाथ महाराज यांनी आपल्या गावात आणले अशा जुन्या आठवणींना उजाळा दिला तेव्हापासून आजपर्यंत या गावात अतिशय उत्तमप्रकारे अखंड हरिनाम सप्तहाची सुरूवात झाली आहे. याठिकाणी बोलताना सांगितले की, माणसांला



ह्या जगात माणूस म्हणून ओळख आहे त्यामुळे सर्वांनी माणूस म्हणून जगले पाहिजे आपल्या जीवनात जगतांना परोपकारी जीवन जगले पाहिजे कारण या जन्मात सोबत काहीच घेऊन जाता येत नाही सर्व गोष्टी इथंच ठेऊन जावे लागते त्यामुळे सोबत काही नेयचे असेल तर हरिनानाचा गजर करून पुण्याचा पार घेऊन जा असा मोलाचा संदेश दिला आहे जीवनामध्ये आपली पिढी सुसंस्कृत होईल यासाठी माता भगिनींनी विशेष लक्ष दिले पाहिजे आणि आपल्या घरात व समाजात सुसंकृत पिढी कशी निर्माण होईल याची काळजी घेतली पाहिजे, हिंदू संस्कृती आणि धर्म जपला पाहिजे अन हिंदू संस्कृती ही जगात सर्वात श्रेष्ठ संस्कृती असून मध्ये घरात आई अंगणात गाईची सेवा केली पाहिजे, गावातील तरुणांनी पूर्वीप्रमाणे खेळ खेळावे , शारीरिक व्यायाम करावा त्यामुळे आपले आरोग्य निरोगी राहील याची दक्षता घ्यावी, हा हरिनाम सप्ताहा म्हणजे साधी गोष्ट नाही तर हा एक मोठा सोहळा आहे आणि हा सोहळा लोकसोहळा झाला पाहिजे ह्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केला पाहिजे यावेळी सामाजिक कार्यकर्ते युवानेते संदीप खाकाळ, शिवक्रांतीचे प्रदेशाध्यक्ष दिपक सोनवणे, हभप कारभारी धस, हभप सुभाष सोनवणे, भोसले महाराज,हभप ज्ञानेश्वर भालेकर , काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष रविकाका ढोबळे, काकासाहेब कर्डीले, डॉ उद्धव सोनवणे, ह.भ.प भगवान वाघुले, दत्ता बागल,शरद रासकर, रमेश भालेकर, बाळासाहेब वाघुले,डॉ. बाळासाहेब धाडगे, बाळासाहेब राऊत, पंडित महाडिक, अजिनाथ महाडीक, सामाजिक, राजकिय, धार्मिक, व्यापारी सह शेरी बु खाकाळवाडी, वटनवाडी, जळगाव अन पंचक्रोशीतील माता भगिनी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते या हरिनाम सप्तहासाठी अनेक दानशूर व्यक्तीने गेल्या आठ दिवसापासून अन्नदान केले तर पिण्यासाठी पाणी पुरवठा तात्या सोनवणे, ईश्वर सोनवणे, नितीन राऊत यांनी केले तर संभाजी सोनवणे, अमोल सोनवणे अन्नदान केले तर इन्व्हर्टरची (लाईट) सोय राजू रासकर यांनी केली.

# प.पु म.नि.प.अल्लमप्रभू महास्वामी यांचा पट्टाभिषेक सोहळा संपन्न

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**सुनील बस्वराज हावा । उदगीर**

पारकट्टी गल्ली उदगीर येथील चौकी मठाचे नुतन मठाधिश प.पु.म.नि.प्र.श्री अल्लमप्रभू महास्वामी यांचा पट्टाभिषेक सोहळा असंख्य भक्तांच्या उपस्थितीत मंत्रोच्चारात संपन्न झालायावेळी माजी आ.मनोहर पटवारी, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे,बसवराज पाटिल नागराळकर,बाजार समितीचे माजी सभापती सिध्देश्वर पाटिल,रेवणसिध्दप्पा हेग्गने,बसवकुमार पाटिल बिदर,अॅड संजय पत्रिके ,शरणप्पा मिठारे, विरशैव समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापुरे, सौ.गुणवंती मिठारे,उद्धव महाराज हैबतपुरे,श्रीमती लक्ष्मिबाई पांढरे,चनबसअप्पा वगदाळे,शिवकुमार गुळंगे,शांता देशमुख,चंद्रकला स्वामी,सरोजनी डांगे,कल्पना पाटिल,श्रीमती चंद्रमा कंटे,नागनाथ अंबेसंगे,पंचय्या स्वामी,हणमंराव औरादे,कल्लप्पा गुळंगे, सोमवार दि.१ जानेवारी २०२४ रोजी ब्रम्हमुहर्तावर चिन्मय व अनुग्रह दिक्षा प्रदान कार्यक्रम प.पु.म.नि.प्र.डॉ..शिवानंद महास्वामी हुलकुंटी ,हुलसुर यांच्या हस्ते प्रारंभ होऊन सकाळी ठिक ११वाजता संपन्न झाला.प.पु.श्री सिध्देश्वरानंद स्वामी यांना षटस्थल क्रिया मुर्ती नंजेश्वर महास्वामी भरतनूर,सिध्दलिंग



महास्वामी ठाणा कुसनूर,सिध्दराम महास्वामी,रटकल,अभिनव चन्नबसवेश्वर स्वामी,अल्लमप्रभू लिंगस्वामी नागूर,सिध्दलिंग महास्वामी यांच्या हस्ते दिक्षा प्रदान करण्यात आली .अकरावाजता शुन्य सिहांसन पिठारोहण ष.ब्र.शंभूलिंग शिवाचार्य महाराज,शंकरलिंग मठाचे सुखदेव महाराज यांच्या उपस्थितित प.पू.म.नि.प्र.डॉ.शिवानंद महास्वामी यांनी सिध्देश्वरानंद स्वामी यांचे श्री.म.नि.प्र. अल्लमप्रभू महास्वामी असे नामकरन करुन पिठारोहण केले. यावेळी श्री गूरु हावगी स्वामी मठाचे मठाधिश डॉ.शंभूलिंग शिवाचार्य महाराज यांनी आपल्या आशिर्वचनात म्हणाले की,मठाच्या माध्यमातून मठाधिश धर्म प्रसारातून चांगल्या संस्काराची वृध्दी करण्याचे कार्य करतात अशा कार्यक्रमात भक्तांनी सदैव सहभागी व्हावे.यांचबरोबर गूरु नंजेश्वर महास्वामी भरतनूर,सिध्दलिंग महास्वामी ठाणा कुसनूर,सिध्दराम महास्वामी,रटकल,अभिनव चन्नबसवेश्वर स्वामी,अल्लमप्रभू लिंगस्वामी नागूर,सिध्दलिंग महास्वामी देवणी या महाराजांनी आशिर्वचनातून धर्मउपदेश केला.पट्टाभिषेक सोहळ्यानंतर नुतन मठाधिश श्री म.नि.प्र. अल्लम प्रभू महास्वामी व म.नि.प्र.डॉ.शिवानंद महास्वामी यांची रथातून भव्य शोभा यात्रा काढण्यात आली या शोभा यात्रेत माळेवाडी,औंकारेश्वर भजनी मंडळ एस.टी.कॉलनी,बामणी ,आजोबा गणपती महिला भजनी मंडळ यांच्या सह महिला पुरुष अबालवृध्द भक्तगण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पट्टाभिषेक सोहळा यशस्वी करण्यासाठी सुभाष धनुरे, बाबुराव पांढरे,शिवलिंग मुळे, गंगाधर बिरादार माळेवाडीकर,ड. बसवराज मुळे,सुरेश कुरुपखेळगे, अंकेश धनुरे,गुरुनाथ धनशेट्टे, राजकुमार हुडगे,काशिनाथ अंजुरे,शिवकांत सोमा,शांतवीर मुळे,डॉ.रवी मुळे,विजय कणजे,विनोद रंजिरे,महेश झुंगा, प्रभुराज काप्पिकेरे, गुंडप्पा समगे,पिंटू अंजूरे,संजय धनुरे,महादेव हरकरे, षन्मुख मठपती,रामलिंग झुंगा,संगम धनूरे,काशिनाथ हुडगे,नागेश धनुरे,राहुल धनुरे ,उमाकांत बिरादार,विशाल स्वामी,आदित्य कुरूपखेळगे,कार्तिक पांढरे, विश्वनाथ समगे,साहिल अंजुरें,सुमित मुळे,बबलू मुळे, वैजीनाथ टाकळे,प्रशांत हुडगे,संगमेश चिल्लारगे,बाळू बांगबंदे,विष्णू महेंद्रकर,भीम हाळे,जगदीश अन्नकल्ले, सौ.अश्विनी स्वामी,जगदेवी झुंगा, , शांतप्पा अनशेट्टे,विश्वनाथ समगे,शंकर गुडे,सोमनाथ मुळे,विश्वनाथ धनशेट्टे,महादेव हत्ते, राजकुमार नौबदे,शिवपुत्र झूंगा आदीनीं परिश्रम घेतले.

# ब्राह्मण संघर्ष समितीचा जनसंपर्क अभ्यास दौरा १३ जानेवारी पासून-दीपक रणनवरे

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**जालना । मेश देशपांडे**

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या वतीने २८ नोव्हेंबर पासून जालना येथे अमरण उपोषण करण्यात आले होते शासनाने याची दखल घेऊन समस्त ब्राह्मण समाजाच्या शिष्टमंडळानस नागपूर येथे बैठक घेऊन परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मुख्यमंत्री यांनी घोषणा केली व पुढील कार्यवाही करण्याचे आदेश मुख्य सचिव यांना दिले सदरील बैठकीतील निर्णय व समाजाची आजची सामाजिक आर्थिक शैक्षणिक परीस्थितीचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्रभर समाज जनसंपर्क अभ्यास दौरा केला जाणार आहे अशी माहिती मुख्य समन्वयक उपोषण करते दीपक रणनवरे यांनी दिली आहे . दिनांक १३ जानेवारी रोजी बालाजी मंदिर केज येथुन अभ्यास दौरा सुरू होणार असून यामध्ये अंबेजोगाई,परळी, गंगाखेड,पालम



पुर्णा परभणी या गावांचा समावेश आहे टप्याटप्याने संपूर्ण महाराष्ट्रात हा दौरा होणारं आहे या मध्ये समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती मुख्य समन्वयक तथा उपोषण करते दीपक रणनवरे, धनंजय कुलकर्णी, श्रीकांत जोशी, विजया कुलकर्णी मकरंद कुलकर्णी विश्वजित देशपांडे बाजीराव धर्माधिकारी अँड बलवंत नाईक अँड सुरेश कुलकर्णी ड राजेंद्र पोदार इश्वर दिक्षित अनिल डोईफोडे संतोष कुलकर्णी शाम कुलकर्णी भगवान पाटील मंदार कुलकर्णी आशोक वाघ अनिल देव यांच्या सह विभागा प्रमाणे समन्वयक दौऱ्यात राहणार आहेत या मध्ये कुटुंब नोंदणीचा फॉर्म भरून घेण्याची जबाबदारी समन्वयक यांच्या कडे देण्यात येणार आहे तरी सर्व समाज बंधू भगिनींनी या कार्यास सहकार्य करावे ही नम्र विनंती या कार्यक्रमाचे नियोजन संजय देशपांडे,अभय शिवनगिरीकर सुमीत कुलकर्णी मधुसूदन दंडारे प्रारब्ध दाभाडकर चैतन्य नाईक सौ प्रज्ञा भिडे सौ. विजया आवस्ती शुभांगी देशपांडे शालीनी पुराणिक दिपा बिनीवाले आनंदी अय्यर विशाखा नाईक प्रतिभा खाडे योगेश जानतीकर , व्यंकटेश जोशी , महेश अकोलकर , शाम कुलकर्णी , अनिल दिक्षीत , प्रविण जोशी अनंत वाघमारे शशिकांत दाभाडकर लिना दापोलीकर हे करत आहेत.

# युवा नेतृत्व पृथ्वीराज पाटील एकंबएकर यांचा हृदय सत्कार संपन्न

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**सुनील बस्वराज हावा । उदगीर**

तरुण तडफदार युवा नेतृत्व सीमा लढ्याचे नायक कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर यांचा वारसा घेऊन चालणारे आणि सीमा लढ्याच्या एकीकरण समितीचे सचिव म्हणून कार्यरत असलेले पृथ्वीराज पाटील यांचा हृदय सत्कार स्वामी विवेकानंद नगर च्या वतीने प्रा. डॉ. कदम नरसिंग अप्पासाहेब यांनी व सर्व मित्र परिवाराकडून करण्यात आला. त्यांनी नुकतेच किसान शिक्षण प्रसारक मंडळाच्या निवडणुकीमध्ये स्वतःवर जबाबदारी घेऊन महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. यावेळी सत्काराला उत्तर देत असताना पाटील म्हणाले कुठलीही अपेक्षा न ठेवता मी अविरतपणे कार्य करत राहणार आहे .कुठलेही कार्य करताना निस्वार्थी भाव



असावा असेही ते म्हणाले. यावेळी अनेकांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी कार्यक्रमाला अप्पासाहेब कदम, जाधव श्रीधर, इंचोरे एल. व्ही ,कन्नाडे कार्तिक ,आलमखाने अंबादास, सुभाष तगाळे, पाटील प्रकाश, स्वामी मलकू, पाटील उत्तमराव आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कदम नरसिंग ,सूत्रसंचालन इंचोरे एल.व्ही. तर आभार श्रीधर जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला कॉलनीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मीमांसा फाऊंडेशन वतीने दिले जाणाऱ्या निर्भीड पत्रकारिता पुरस्कार गोविंद कदम यांना जाहीर

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**लोहा/विशाल घंटे**

लोहा मीमांसा फाऊंडेशन, दै. समीक्षा, मिडीया



पोलीस सोशल क्लब व मंथन क्रिएटीव्ह ग्रुपच्यावतीने दरवर्षी पत्रकार दिनानिमित्त आपल्या लेखणीतून वंचित घटकांना न्याय मिळवून देणारा पत्रकार क्षेत्रातील निर्भीड पत्रकार पुरस्कार लोकमतचे तालुका प्रतिनिधी तथा वाईस ऑफ मीडिया पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष गोविंद कदम यांना जाहीर झाला आहे.

पुरस्काराचे वितरण पाच जानेवारी मिनी सह्याद्री हॉल शासकीय विश्रामगृह नांदेड येथे दैनिक समीक्षाचे मुख्य संपादक, पुरस्काराचे संयोजक रुपेश पाडमुख ,रामेश्वर धुमाळ यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील आदी मान्यवरांच्या उपस्थित होणार आसुन उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार गोविंद कदम यांना जाहीर झाल्याबद्दल नांदेड लोकसभेचे खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, लातूर खासदार सुधाकररावजी शृंगारे, आमदार शामसुंदरजी शिंदे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे राज्य संघटक एकनाथ पवार, माजी शिक्षण सभापती संजय पाटील क-हाळे कॉंग्रेस तालुकाध्यक्ष तथा मा.उपनगराध्यक्ष लोहा शरद पाटील पवार, यांच्यासह आदी मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# गुंटूर येथे पालखी सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**कंधार।धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील गुंटूर येथील श्री संत योगीराज निवृत्तीनाथ महाराज मंदिरात पालखी सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ दि.०२ जानेवारी २०२४ रोजी झाला. तर दि.०९ जानेवारी २०२४ रोजी काला होणार आहे,गुंटूर येथील श्री संत योगीराज निवृत्तीनाथ महाराज मंदिरात २ ते ८ जानेवारी दरम्यान हरिणाम सप्ताह तसेच ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायणाचे आयोजन केले आहे. यानिमित्त विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम तसेच कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. दररोज पहाटे आरती, सायंकाळी ज्ञानेश्वर पारायण, हरिपाठ, स्थानिक भजने तर २ जानेवारी पासून कीर्तन श्री. ह.भ.प. संजय महाराज माने, निलंगेकर, व्यंकट महाराज पांचाळ, एकलारकर, राजेश महाराज पाटील, गुजरंगेकर, शितलताई साबळे पाटील, गुरुवर्य नामदेव महाराज, दापकेकर, गंगाराम महाराज राऊत, पैठणकर, माऊली महाराज, जाहूरकर (आळंदी) (बालकिर्तनकार, झी टॉकीज फेम) तर ९ रोजी काल्याचे किर्तन श्री.ह.भ.प.पांडूरंग महाराज उगले,परभणीकर यांचे असणार आहे. तरी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या सुवर्ण सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आव्हान गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बोरगावचे विकास पुरुष पुंडलिकराव पाटील बोरगावकर यांचे लोह्याचे तहसिलदार शंकर लाड यांच्या वतीने अभिष्टचिंतन



**लोकनेता न्युज नेटवर्क**
**लोहा / विशाल घंटे**

बोरगाव आ.येथे शासनाच्या विविध योजना राबवून सर्वांगिण विकास करणारे विकास पुरुष शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते आ . शामसुंदर शिंदे यांचे खंदे समर्थक सरपंच प्र. पुंडलिकराव हरजी पाटील बोरगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे लोह्याचे तहसिलदार शंकर लाड यांनी शाल पुष्पहार घालून अभिष्टचिंतन करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी नायब तहसीलदार अशोक मोकले, शेकापचे जिल्हाध्यक्ष शिंदे, सुधाकर सातपुते, सिध्दू वडजे, अजित पाटील बोरगावकर, तलाठी विभुते, भदरगे आदी उपस्थित होते. तसेच आ.शामसुंदर शिंदे,शेकापच्या महिला प्रदेशाध्यक्षा सौ. आशाताई शामसुंदर शिंदे,लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे यांनी ही पुंडलिकराव पाटील बोरगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा दिल्या.

# स्वर्गीय डॉ.भाई केशवरावजी धोंडगे हे सामाजिक संत होते -ह.भ.प.अक्रुर महाराज साखरे

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**लोहा /विशाल घंटे**

जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी माजी आमदार व खासदार डॉ.भाई केशवराव धोंडगे यांनी आयुष्यभर गोरगरीब,सामान्य अशिक्षित,नाही रे वाले,कुणबी,बळीराजा आठरा पगड जातीसाठी व गाव,वाडी,तांडयावरील जनतेसाठी सामाजिक कार्य केले. म्हणुन डॉ .भाई केशवराव धोंडगे यांना सामाजिक संत म्हणणे सार्थ ठरणार आहे असे प्रतिपादन ह.भ.प.अक्रुर महाराज साखरे यांनी केले. दि.१ जाने रोजी जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी डॉ.भाई केशवरावजी धोंडगे यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्त क्रांतिभुवन बहाद्दरपुरा येथे भव्य कीर्तन सोहळा आयोजित केला होता याप्रसंगी ते बोलत होते.भाई केशवराव धोंडगे यांनी कधीच जातपात मानली नाही. सामाजिक कार्याबरोबरच ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी शैक्षणिक क्रांति घडवली.गोरगरीबांच्या आठरापगड जातीच्या हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. विद्यार्थी शिकून आज मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत. त्यांचे कार्य आजही समाजासाठी उपयोगी आहे.अशी माणसं समाजातील गोरगरीब,सामान्य,कष्टकरी, कुणबी,नाहिरेवाल्याच्या उद्धारासाठी जन्माला येतात. स्वतःसाठी कोणीही जगते पण धोंडगे साहेब इतरांसाठी जगले व ईतरांनाही जगायला शिकवले. समाज उपयोगी कार्य करा म्हणजे मानवी जीवन समृद्ध आणि सफल होईल असेही ह.भ.प.अक्रूर महाराज साखरे यांनी आपल्या मधुर वाणीने कीर्तनाच्या माध्यमातून उपस्थितांना संबोधित केले. पुरुषोत्तम धोंडगे यांनी वडिलांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त आभार व्यक्त करतांना माझ्या बाबांवरती प्रेम करणाऱ्या वयोवृद्धांच्या मोतीबींदुचे आपरेशन करुन कंधार व लोहा तालुका



अंधमुक्त करण्याचा संकल्प केला. यावेळी श्री गुरु एकनाथ महाराज उमरजकर,नामदेव महाराज बारुळ,अवधुतगीर महाराज बाचोटी, विशुध्दानंदजी महाराज हाळदा,पंचक्रोशीतील नागरीक,वासुदेव, गुराखीराजे,कुणबीराजे व स्थेतील सहकारी उपस्थित होते.भाई केशवराव धोंडगे यांच्या समाधीस्थळी खा.प्रताप पाटील चिखलीकर,माजी आमदार भाई गुरुनाथराव कुरुडे,आमदार श्यामसुंदर शिंदे,आमदार तुषार राठोड,आमदार राम पाटील रातोळीकर ,आमदार मोहन अण्णा हंबर्डे,माजी आमदार रोहिदासराव चव्हाण,माजी आमदार शंकर अण्णा धोंडगे,माजी जि.प.अध्यक्ष दिलीप पा.बेटमोगरेकर,संजय भोसीकर,बालाजीराव पांडागळे, एकनाथराव मोरे, प्रणितीताई देवरा,संजय पा. बेळगे,बाबु पा.गीरे,राजासाहेब देशमुख,कपील पाटील,सदाशीव जाधव, अड.संदीप गव्हाणे, माजी नगराध्यक्ष रामराव पवार,उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी,जफरखानसाब, लोहा माजी उपनगराध्यक्ष सोनु संगेवार,श्री शरद पवार, शहाजी नळगे, माधवराव पटणे, सत्यनारायण मानसपुरे,वैजनाथ सादलापुरे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी,विविध विभागांचे अधिकारी लोहा,कंधार तालुक्यातील नागरीक हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून भाई धोंडगे साहेबांच्या समाधीस्थळी अभिवादन केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904